# रेल्वेने पसार झालेला चोरटा पुण्यात अटकेत

## लोहमार्ग पोलिसांची पुण्यात कारवाई

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कोल्हापूर येथे चोरी करून पसार झालेल्या चोराला पुणे लोहमार्ग पोलिसांनी पुणे रेल्वे स्थानकात अटक केली आहे. कोल्हापूर पोलिसांनी आरोपीचा फोटो 'व्हॉट्सअॅप'वर व्हायरल करून, तो रेल्वेने पळाला असण्याची शक्यता व्यक्त केली होती. लोहमार्ग पोलिसांनी तातडीने कार्यवाही केल्याने चोराला पकडणे शक्य झाले.

संदीप जीवनलाल कसेरा (वय २४, रा. उत्तर प्रदेश) व्यास लोहमार्ग पोलिसांनी अटक केली. त्याच्यावर कोल्हापूरमधील राजारामपुरी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याने, त्यास पुढील कार्यवाहीसाठी राजारामपुरी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

'कोल्हापूर येथून एक व्यक्ती सोने, चांदी चोरून पसार झाला आहे. त्याचा फोटो 'व्हॉट्सअॅप'वर पाठवित आहे. तो रेल्वे गाडीने पळाला असल्याची शक्यता आहे,' अशी माहिती शनिवारी रात्री पुणे रेल्वे नियंत्रण कक्षाला प्राप्त झाली. येथील कर्मचाऱ्याने पुणे लोहमार्ग पोलिस ठाण्याच्या अंमलदारास फोनवरून त्याबाबत कळविले. ही माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेशसिंग गौड यांनी तातडीने कार्यवाही करण्याची सूचना केली. त्यानुसार ड्युटीवर असलेल्या उपनिरीक्षक आणि इतर कर्मचारी रेल्वे स्थानकात 'महाराष्ट्र एक्स्प्रेस' येण्याची प्रतीक्षा करीत होते. ही गाडीत स्थानकात येताच, त्यांनी शोध घेण्यासाठी धाव घेतली. त्या वेळी गाडीच्या जनरल डब्यात 'व्हॉट्सअॅप'वरील फोटोशी मिळता चेहरा असलेला व्यक्ती आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, 'पैशांची अडचण असल्याने चांदीच्या आठ पट्ट्या घेऊन गावी चाललो होतो,' अशी कबुली त्याने दिली.

### चोर सराफाच्या दुकानातील नोकर

लोहमार्ग पोलिसांनी आरोपीकडे चोरीच्या मालाची चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली. 'आरोपी जवाहरमल सोमाणी पुरोहित (रा. कोल्हापूर) यांच्याकडे कामाला होता. पुरोहित यांचा सोन्या-चांदीचा व्यवसाय असून, पैशांची गरज असल्याने आरोपीने त्यांच्या दुकानामधून चांदीच्या आठ पट्ट्या चोरल्या,' अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेशसिंग गौड यांनी दिली.

Scanned with CamScanner